2021-22-RGS-(3)


VOLUME-VIII : ISSUE-I (February-2022)

ISSN :2455-4375

IMPACT FACTOR : 5.473 (SJIF)





**UPA National Peer-Reviewed - Refereed & Indexed Journal**


CHIEF EDITOR

Dr. Anil Dodewar

EDITOR

Dr. Ghizala. R. Hashmi
Dr. Siddharth Meshram
Prof. Mohammad Asrar

ASSOCIATE EDITOR

Dr. Sharad Meshram
Dr. Pranaya Patil



PUBLISHED BY:

UPA GROUP PUBLICATION
In Association With
Seth Kesarimal Porwal College of Arts and Science and Commerce, Kamptee

CORPORATE OFFICE:

38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

PUBLICATION :

The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.



© All Rights Reserved © The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.



For downloading the Issue, Click the link given below
https://upa.org.in/special-issue.php?id=MTc=
Visit : www.upa.org.in

Share your valuable feedback at
upanagpur@gmail.com
upajournal@gmail.com


## UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

Published By
UPA Group Publication

In Association With

SETH KESARIMAL PORWAL COLLEGE OF ARTS AND SCIENCE AND COMMERCE

KAMPTEE (NAGPUR)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | **Dr. Prashant P. Yende**<br>Dr. Ambedkar College,Deekha Bhoomi, Nagpur<br>**Dr. Pankaj V.Nimbalkar**<br>Dr. Ambedkar College,Deekha Bhoomi, Nagpur | IMPACT OF DATA WAREHOUSING AND DATA MINING IN BUSINESS | 62-71 | | |
| 14 | **Dr. Swapnil R. Dahat**<br>S.K.Porwal College, Kamptee | EXPLORING MAGIC REALISM IN KIRAN DESAI'S HULLABALOO IN THE GUAVA ORCHARD | 72-77 | | |
| 15 | **Dr. Pankaj V. Nimbalkar**<br>Dr. Ambedkar College, Deekshabhoomi, Nagpur | SUMMARIZATION OF AUTOMATIC TEXT SIMPLIFICATION USING NATURAL LANGUAGE PROCESSING | 78-82 | | |
| 16 | **Renuka P. Chopde**<br>S. Chandra Mahila Mahavidyalaya Sakoli<br>**Sanjay Meshram**<br>M. B. Patel College Sakoli, | STUDY OF NUTRITION CONTENT AND MEDICINAL VALUE IN SOME EDIBLE WILD FOREST VEGETABLES COMMONLY FOUND IN BHANDARA DISTRICT (M.S.) | 83-93 | | |
| 17 | **Heena Kausar**<br>S. K. Porwal College, Kamptee | RHONDA BYRNE'S THE SECRET: A BOOSTER TO WILL POWER AND POSITIVITY | 94-97 | | |
| 18 | **Dr Jayshree Thaware**<br>S.K.Porwal College of Arts and Science and Commerce, Kamptee | POLLEN MORPHOLOGICAL AND PHYSIOLOGICAL STUDIES OF RAPHANUS SATIVUS LINN | 98-106 | | |
| **Section:- Marathi** | | | | | |
| 1 | **प्रा. अरूण डी. मोरे**<br>पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा जि. जळगांव | मी माझ्या भूमिच्या शोधात: एक आंबेडकरी विचारधारा | 1-4 | | |
| 2 | **डॉ जयश्री लक्ष्मणराव भोसीकर**<br>सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णूपुरी, नांदेड | भारतीय स्त्री शिक्षणाचा इतिहास – एक दृष्टिक्षेप | 5-9 | | |
| 3 | **प्रा.डॉ. श्रीकृष्ण बी.बोढे**<br>रा.सु.बिडकर महाविद्यालय हिंगणघाट | आर्थिक विकासात महिलांचे योगदान -एक अर्थशास्त्रीय दृष्टी | 10-14 | | |
| 4 | **डॉ.शंकर आर.गुजरकर**<br>एस.एम.के.झोटिंग पाटील कॉलेज समुद्रपूर | महामारीनंतर भारतीय औद्योगिक क्षेत्राची स्थिती व आव्हाने – एक आर्थिक विवेचन | 15-21 | | |
| 5 | **प्रा.डॉ. आर.जी.सुरळकर**<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | आदिवासी विकास धोरण आणि निती | 22-26 | | |
| 6 | **प्रा.अभय जायभाये**<br>एन.एस.एस.संचालक शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर | आदिवासीच्या विकासाकरीता शैक्षणिक व आरोग्य् विषयक धोरण | 27-30 | | |

IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal*
*Volume -8 : Issue-1 (February-2022)*
ISSN 2455-4375

# आदिवासी विकास धोरण आणि निती

**प्रा.डॉ. आर.जी.सुरळकर**
श्रीमती सिंधुताई जाधव
कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर
मो.9423722627
मेल: rameshsuralkar@gmail.com

---

स्वातंत्र्यानंतर देशाचे संविधान निर्माण करण्यात आले. सर्वांना समान अधिकार देण्यात आले. सर्वांना विकासाची समान संधी मिळावी. हा दृष्टीकोन भारतीयांनी स्विकारला. भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वाचा स्विकार केला. या तत्त्वानुसार भारतीय समाजातील विषमता दूर करणे शक्य झाले. अनुसूचित जाती, जमातीचा विकास करण्यासाठी अनेक तरतुदी घटनेमध्ये करण्यात आल्या आहेत. आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये महत्त्वाची तरतूद केली आहे. आदिवासींच्या संदर्भात घटनेतील तरतुदी डॉ. आंबेडकरांनी लक्षपूर्वक केल्या आहेत. त्यांनी आदिवासींना अनुसूचित जमाती हा शब्द वापरला आहे.

**आदिवासींच्या विकासाबाबत घटनात्मक तरतूदी -** आदिवासीच्या विकासाबाबत अनेक घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

**अ) सामाजिक तरतुदी**

१) घटनेच्या कलम १४ नुसार भारताच्या कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण अशी तरतूद करण्यात आली आहे.

२) कलम १५ (१) नुसार कोणत्याही नागरिकाविरूद्ध कोणताही धर्म, वंश, जात, लिंग या आधारे भेदभाव केला जाणार नाही.

३) कलम १५ (२) नुसार धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आधारावर एखाद्या नागरिकाला दुकान, भोजनालय, उपहारगृह, मनोरंजनाचे ठिकाण इ. प्रवेशाबाबत तसेच जनतेसाठी असलेल्या विहीर, रस्ते सार्वजनीक ठिकाणी कोणतेही निर्बंध घालता येणार नाहीत.

४) कलम १५ (४) नुसार नागरिकांपैकी सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या हितासाठी अनुसूचित जाती, जमातीच्या हितासाठी शासन विशेष तरतूद करू शकते.

५) कलम १६ (१) नुसार राज्याच्या अंतर्गत सेवा योजना किंवा पदाकरीता सर्व नागरिकांना समान संधी देण्यात आली आहे.

६) कलम १६ (४) नुसार राज्यसेवेमध्ये नागरिकांना त्यांच्या प्रवर्गांमध्ये योग्य प्रतिनिधीत्व मिळाले नसल्यास अशा वर्गाकरीता पदे राखून ठेवण्यात आली आहेत.

७) कलम १६ (४) (ब) नुसार अनुसूचित जाती, जमातीसाठी पदाच्या कोणत्याही श्रेणीमध्ये पदोन्नतीच्या संदर्भात तरतूद करण्याचा अधिकार राज्याला दिला आहे.

८) कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती, जमातीकरीता एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आला आहे. अनुसूचित जाती, जमातीच्या कल्याणासाठी संविधानाने दिलेल्या तरतुदीचे पालन होते की नाही या संबंधीचा अहवाल राष्ट्रपतीला सादर करावा लागतो. हा अहवाल संसदेच्या सभागृहापुढे ठेवला जातो.

९) कलम ३४२ नुसार राष्ट्रपतींना अधिकार देण्यात आला आहे. राष्ट्रपती राज्याच्या राज्यपालाच्या सल्ल्याने प्रत्येक राज्यातील अनुसूचित जमाती कोणत्या आहेत, हे ठरविले जाते. अशी तरतूद घटनेत केलेली आहे.

१०) कलम १६४ नुसार आदिवासी कल्याणाकरीता आणि त्यांच्या हिताचे संरक्षण करण्याकरीता राज्यात सल्लागार परिषदा आणि स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र सरकारमध्ये विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या कलमानुसार मध्यप्रदेश, आसाम, बिहार, ओरिसा या राज्यामध्ये आदिवासी कल्याण मंत्रालय निर्माण करण्यात आले आहे.

**ब) आर्थिक तरतुदी :**

१) कलम ४६ नुसार राज्ये दुर्बल वर्ग, अनुसूचित जाती, जमातीला शैक्षणिक, आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण केले जाईल. त्यांना शोषणापासून अन्यायापासून संरक्षण दिले जाईल.

२) कलम २७५ (१) नुसार अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी राज्यातील अनुसूचित क्षेत्राची पातळी त्या राज्याच्या उर्वरीत क्षेत्राच्या पातळी एवढी उंचावण्यासाठी विशेष तरतूद करण्यात येईल.

३) कलम ३३५ नुसार संघराज्य किंवा राज्ये यांच्या सेवामध्ये आणि पदावर नियुक्ती करताना अनूसूचित जाती, जमाती यांचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी संसंगत असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**क) राजकीय तरतुदी**

१) कलम ३३० नुसार अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांना लोकसभेत प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव ठेवल्या आहेत.

२) कलम ३३२ नुसार अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांना राज्याच्या विधानसभेत आरक्षणाची तरतूद नमूद करण्यात आली आहे.

३) कलम ३४३ (घ) ७३, ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार प्रत्येक पंचायतीला अनुसूचित जाती, जमातीकरीता आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

४) कलम २४४ (१) नुसार पाचव्या अनुसूचिच्या माध्यमातून अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाच्या संबंधात भारताच्या राष्ट्रपतीस राज्यपालाद्वारे वार्षिक अहवाल सादर केल्यास कोणत्याही राज्यातील अनुसूचित क्षेत्राचा विकास करण्यासाठी अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी एका आदिवासी सल्लागार परिषदेची स्थापना करावी लागते.

५) कलम २४४ (२) नुसार अनुसूचित क्षेत्रांना स्वायत्त जिल्हे आणि स्वायत्त क्षेत्राचे गठण करणे, त्याचबरोबर जिल्हा परिषदेची निर्मिती करण्यासाठी आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम राज्यातील क्षेत्राच्या प्रशासनासाठी सहाव्या अनुसूचिच्या माध्यमातून विशेष तरतूद करण्यात आली आहे.

६) कलम १६४ (६) नुसार आसाम व्यतिरिक्त बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा या राज्यात आदिवासी मंत्रालय स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Volume -8 : Issue-1 (February-2022)
ISSN 2455-4375

७) आदिवासींची लोकसंख्या जास्त असलेल्या प्रदेशात राज्यपाल राष्ट्रपतीनी त्या भागाला अनुसूचीत क्षेत्र असे घोषीत करावे. अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जमाती यांचे प्रशासन आणि नियंत्रण याबाबतच्या अत्यंत महत्त्वाच्या तरतुदी संविधानाच्या अनुसूचिमध्ये करण्यात आलेल्या आहेत.

भारतीय संविधानात आदिवासीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाच्या संदर्भात अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. यावरून आदिवासीबाबत असलेला शासनाचा दृष्टीकोन स्पष्ट होता. आदिवासीबाबत संविधानात्मक तरतुदी अनेक आहेत त्यानुसार आदिवासीचा विकास करण्यात येतो.

**जमिनीच्या अधिकाराबाबत शासनाचे धोरण (Govt. Policy of Right on Land) :-** आदिवासी लोक जंगलात, दऱ्या खोऱ्यात वास्तव्य करतात. त्यांचे संपूर्ण जीवन शेतीवर, जंगलावर अवलंबून असते. त्यांचे उपजिवीकेचे साधन जंगल, वन हेच आहे. इंग्रज शासनाने १८५६ मध्ये कायदा केला. या कायद्यानुसार त्यांचा वनावरील अधिकार काढून घेण्यात आला. या कायद्यामध्ये १९२७ मध्ये सुधारणा करण्यात आली. हे दोन्ही कायदे आदिवासीच्या जमीन आणि जंगल संपत्तीवर अतिक्रमण करणारे आहेत. आदिवासींना त्यांच्या जमिनीवर हक्क मिळावा, त्यांना वनातून जीवनावश्यक वस्तू मिळविता याव्यात. म्हणून २००६ मध्ये भारत सरकारने वन अधिकार कायदा पास केला. हा कायदा अनुसूचित जमाती आणि इतर जंगल निवासी यांच्यासाठी करण्यात आला. २००६ चा वन कायदा या नावाने हा कायदा ओळखला जातो. हा कायदा ११ डिसेंबर २००६ रोजी पास झाला. या कायद्याची अंमलबजावणी ३१ डिसेंबर २००७ पासून करण्यात आली. हा कायदा देशातील आदिवासीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या कायद्यानुसार आदिवासीना कायदेशीर संरक्षण मिळाले. आदिवासी लोक जंगलात आणि जंगला लगतच्या भागात वास्तव्य करतात. या लोकांची संख्या १० कोटी आहे. यावरून स्पष्ट होते की. आदिवासी लोक शेतीवर आणि जंगलावर अवलंबून आहेत. या दोन घटकावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. त्यांचे हे अधिकार कधीही ग्राहय धरले नव्हते. ब्रिटीशकालीन कायद्यानुसार वनविभाग आणि वनातील अधिकारी हे जंगलाचे राजे बनले. कारण त्यांना कायद्याने सत्ता प्राप्त झाली होती. आदिवासी हे त्यांच्याच जंगल जमिनीवर अतिक्रमण करणारे ठरले होते. आदिवासी लोकांचे वनावरील अधिकार त्यांनी नष्ट केले होते. या अधिकारी लोकांची दहशत आदिवासीवर होती. शासकीय अधिकारांचा वापर करून आदिवासींना जंगलाबाहेर काढण्यात आले होते.

वनामधून जास्तीत जास्त महसूल मिळविण्यासाठी तसेच इमारतीच्या बांधकामासाठी सहजतेने लाकूड मिळविण्यासाठी इंग्रजांनी अनेक कायदे केले. त्या कायद्यानुसार जंगलातील शेती करून वनातील वस्तू गोळा करून उपजिवीका करणाऱ्या आदिवासी यांचे सर्व कार्य बेकायदेशीर ठरविण्यात आले. या कायद्यानुसार आदिवासींना जीवन जगणे कठीण झाले. या कायद्याचा धाक दाखवून आदिवासी लोकांचे मोठया प्रमाणात शोषण अधिकाऱ्यांनी केले. स्वातंत्र्यानंतर १९२७ च्या कायद्यात बदल करण्यात आला नाही. भारत सरकारने वन्यजीव कायदा १९७२ पास केला. त्यामुळे जंगलाचे प्रशासन च्या कायद्यानुसार चालविले जाऊ लागले. १९९० च्या काळात काही पर्यावरणवादी ज्यांना वन आणि वनसंपत्ती हे आदिवासीपासून वेगळे आहे. आणि कॉर्पोरेट जगतातील औद्योगिक घराणे यांचे लक्ष खनीज संपत्ती आहे. या लोकांनी वन अधिकाऱ्याच्या आधारे जंगलाची लूट केली. यांनी आदिवासींचे शोषण केले. आदिवासींना जंगलाच्या बाहेर काढले. जंगलतोड मोठया प्रमाणात केली. या परिस्थितीमध्ये आदिवासीची मोठया प्रमाणात लुट झाली. त्यांचे उपजिवीकेचे साधन नष्ट झाले. नक्षलवाद्यांनी आदिवासीमध्ये शासनाविषयी इर्षा निर्माण केली. आदिवासीच्या आधारे नक्षलवाद वाढला. या सर्व गोष्टींचा विचार

IMPACT FACTOR 5.473(SJIF) | **UPA NATIONAL E-JOURNAL** | ISSN 2455-4375

*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal*

*Volume -8 : Issue-1 (February-2022)*

करून भारत सरकारने आदिवासींना संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून २००६ चा वन कायदा पास केला. या कायद्यातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

१) निवासासाठी व्यक्तीगत किवा व्यवसायाच्या निमित्ताने वनभूमीत राहण्यासाठी अनुसूचित जमातीला उदरनिर्वाहाचे साधन शेती असल्यामुळे त्यांना जंगलात राहण्याची परवानगी देण्यात आली. त्यांना शेती करण्याची परवानगी मिळाली.

२) सामुदायीक अधिकार राहणार नाही. जमिनदार, रियासतदार, मध्यस्थ् यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

३) जंगलातील आदिवासीना वनातील वस्तू जमा करणे, त्यांचा उपयोग करणे. या प्रकारचे अधिकार देण्यात आले. त्यांनी जमा केलेल्या वस्तुवर मालकी हक्क प्रदान करण्यात आले. यामध्ये झाडाच्या लाकूड उत्पादनाचा समावेश करण्यात आला.

४) शेतीतून मिळणारे उत्पन्न, नदीतून मिळविलेली मासोळी या सर्व साधनावर त्यांचे अधिकार अधिकृत करण्यात आले.

५) आदिवासी जमाती समूह आणि पूर्व कृषि समुदायावर निवास आणि आवासाचे अधिकार प्रदान करण्यात आले.

६) कोणत्याही राज्यामध्ये जमिनीच्या विवादीत दाव्यावर संबंधीत ग्रामसभेला अधिकार देण्यात आले.

७) कोणत्याही राज्याद्वारे दिलेल्या वन जमिनीच्या संदर्भात दिलेला पट्टा यात परिवर्तन करण्याचा अधिकार देण्यात आला.

८) जंगलातील गाळ, जुने खेडे आणि लगतची वस्ती यांचा महसूल गावात समावेश करण्यात आला.

९) वनसंसाधन संरक्षित पुनर्जिवीत किंवा व्यवस्थापन करण्याचा अधिकार समुदायाला देण्यात आला. जे लोक वनाचा उपयोग परंपरागत पद्धतीने करीत होते. वनाचे संरक्षण करीत होते. त्यांना अधिकार प्राप्त झाले.

१०) जैवविविधता व भौतिक संपदा या संबंधीचे सामुदायीक अधिकार आणि जैव विविधता आणि सांस्कृतिक विविधतेशी संबंधीत ज्ञानापर्यंत पोहोचविण्याचा अधिकार देण्यात आला.

११) जंगलातील निवास अनुसूचित जमातीद्वारा पारंपारिक रूपात उपभोग घेतल्या जाणारा अधिकार कलम १ ते ११ मध्ये नमूद नाही, परंतु या अधिकारामध्ये शिकारीचा अधिकार वगळण्यात आला.

वन कायद्यानुसार डिसेंबर २००५ पूर्वीपासून वनात राहणाऱ्या जमाती शेती करीत आहेत. या कायद्यानुसार त्यांना ४ हेक्टरपर्यंत शेती मालकी मिळाली. या कायद्यात काही त्रुटी असल्यामुळे २००८ मध्ये अनुसूचित जमाती आणि इतर परंपरागत आदिवासी यांच्याद्वारे काही नियम तयार करण्यात आले. या नियमात सुधारणा केल्यानंतर अनुसूचित जमाती आणि इतर आदिवासी सुधारीत नियम २०१२ असा कायदा करण्यात आला. २०१२ च्या कायद्यानुसार जंगल निवासाच्या संदर्भात स्पष्ट तरतूद करण्यात आली. जंगलाचे व्यवस्थापन, शाश्वत विकास करण्यासाठी ग्रामसभेला अधिकार देण्यात आले. या कायद्यामुळे आदिवासीच्या जमिनी आणि जंगलावरील अधिकार स्पष्ट झाला.

संदर्भ ग्रंथ सुची :

- डॉ.प्रदिप आगलावे – सामाजिक मानवशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- डॉ.ए.डी.चव्हाण, रा.ज.लोटे - सामाजिक मानवशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
- डॉ.बी.के.किर्दक, डॉ.दया.पांडे - सामाजिक मानवशास्त्र, अथर्व प्रकाशन, जळगांव.
- डॉ.दिनकर उंबरकर - सामाजिक मानवशास्त्र, साधना प्रकाशन, परभणी.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana